भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. भारत देशाला कोणताही एक धर्म नाही. इथले नागरिक कोणत्याही धर्माचा स्वीकार करू शकतात, कोणत्याही धर्माचे पालन करू शकतात. भारतीय राज्यघटनेतील कलम २५ ते २८ नागरिकांना धर्मस्वातंत्र्याचा हक्क देतात.

धर्मनिरपेक्ष असणाऱ्या देशात सार्वजनिक जीवनात धर्माला बाजूला ठेवता आलं पाहिजे. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांच्या निर्देशानुसार संसद सर्व धर्मीयांसाठी कायदा करु शकते. मूलभूत हक्कांवर वैयक्तिक कायदा अतिक्रमण करू शकत नाही. लोकशाहीमध्ये सर्व नागरिक समान असतात. यासमानतेमुळेच राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक ऐक्य, बंधुभाव प्रस्थापित होतो. काही धर्मांध लोक धर्मांचे कायदे (व्यक्तिगत कायदे) यांचा वापर अस्मिता आणि वेगळेपणा वाढविण्यासाठी करतात. धर्मनिरपेक्ष एकात्म समाजनिर्मितीमध्ये समान नागरीकायदा महत्वाचे योगदान देऊ शकतो.

समान नागरी कायद्याची गरज

वास्तविक पाहता, आज जवळपास ९०% कायदे सर्वांसाठी समान आहेतच. फक्त ५-९०% प्रमाण असणारे व्यक्तिगत कायदे प्रत्येक धर्मांतील लोंकांचे वेगळे आहेत. मुस्लिम धर्म वगळता सर्व धर्मांतील कायद्यांमध्ये कमी-अधिक प्रमाणात बदल करण्यात आले आहेत.

देशामध्ये सामजिक समता, राष्ट्रीय एकता, स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्यासाठी समान नागरी कायद्यांची आवश्यकता आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय एकात्मिकता समाज निर्माण करण्यासाठी देखील या कायद्याची गरज आहे.

समान नागरी कायद्यामुळे कोणाचेही धर्माबद्दल असणारे हक्के हिरावून घेतले जात नाहीत. उदाहणार्थ जर बघायचे झाले तर, प्रत्येक जण आपआपल्या धर्म, रुढी, परंपरांचे अनुसरण करुन विवाह करु शकतो. हिंदू-सप्तपदी, मुस्लिम-काझींना बोलावून तर बौद्ध, जैन, शीख, पारसी हे सर्व आपआपल्या धर्मातील चालीरितींनुसार पारंपारिक पद्धतीने लग्न करू शकतात. पण जेव्हा विवाहानंतर काही वाद उद्‌भवतात. कौटुंबिक कलह निर्माण होतात त्यावेळी त्या पारिवारिक समस्यांचे निवारण करण्यासाठी कायदा असला पाहिजे. अशा वेळी पर्सनल लॉ नुसार जर निर्णय घेण्यात आला, तर एखाद्यावर अन्याय होण्याची शक्यता असते, म्हणून अशा प्रकारचे विवाद न्यायालयीन मार्गानेच सुटले पाहिजेत. यासाठी समान नागरी कायदा अस्तित्वात येणे गरजेचे आहे.

***

*"अनुभवामुळेच चांगला निर्णय घेता येतो,*
*मात्र दुर्भाग्य हे आहे की*
*अनुभवाचा जन्म नेहमीच*
*चुकीच्या र्नीयामुळे होतो."*

*"ओंजळीत बसेल एवढं नक्की घ्या पण*
*सांडण्याआगोदरच ते वाटायलाही शिका."*

# लोकशाहीमधील विद्यार्थ्यांची भुमिका



स्नेहल शिवाजी निकम
V NLC

१५ ऑगस्ट १९४७ साली भारत ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाला. स्वतंत्र झाला. पण तरीही देशामसोर अनेक प्रश्न आ वासून उभे होते. त्या प्रश्नांचा सामना करण्यासाठी आणि देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय घडी नीट बसवण्यासाठी घटनाकारांनी घटना तयार केली.

आम्ही भारताचे लोक भारताचे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य घडविण्याचा त्या सर्व नागरिकांस आत्ताच मी म्हणल्याप्रमाणे संविद्यानामध्ये जिचा उल्लेख इतक्या प्रातिनिधिक स्वरुपात केला आहे. किंबहुना ज्या धर्तीवर संविधान बनविले गेले. तो एक प्रमुख उद्देश म्हणजे लोकशाही गणराज्य घडविण्याचा होता.

पण आज समाजामधील वाढत चाललेली दरी, जातीयवाद, वर्ग संघर्ष, खासगीकरण यामुळे उद्भवणारे प्रश्न पाहत लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात आले आहे का हा प्रश्न पडल्यावाचुन राहत नाही. सामाजिक शांतता, सलोखा जपण्यासाठी लोकशाही जतन करणे गरजेचे आहे कारण सतत बहुमताच्या घोड्यावरुन आत्मप्रौढीचे शड्डू ठोकत हिंडणाऱ्यांना पायउतार करण्याची ताकद लोकशाहीत आहे फक्त ही लोकशाही सुदृढ हवी सुदृढ लोकशाहीसाठी त्यामधील तरुणांनी विद्यार्थ्यांनी म्हणजेच युवकांनी त्यामध्ये सक्रियतेने सहभागी असले पाहिजे. आजचा विद्यार्थी युवक लवकरच लोकसंख्येचा एक जबाबदार अंग बनत आहे, ज्याची प्रशासनामध्ये बदल पाहण्याची इच्छा आहे. आजच्या युवकांना याचीही जाणीव आहे की, राष्ट्राच्या बाबतीत त्यांच्या काही जबाबदाऱ्या आहेत आणि दुसरे कोणीही नाही परंतु ते देशाला वाचवू शकतील. भारतीय लोकशाही मधील तरुणांची विद्यार्थ्यांची एक प्रमुख भुमिका आहे. निर्णय घेणाऱ्या तरुणांना आळशी व निरुत्साही समजत असले तरीही त्यांच्या गरजांनुसार चांगला निर्णय शहाणा निर्णय घेण्याचे कौशल्य त्यांच्यात आहे.

आजच्या लोकशाही समोर जातीयवादाच जे मोठ आव्हान आहे त्याचा बिमोड करणे हे फक्त तरुणांच्या खुल्या विचार आणि मुक्त विचारसणीमुळे सहज शक्य आहे. आज लोकशाही मधील वाढता दहशतवाद तसेच गुन्हेगारांचे साम्राज्य रोखावयाची ताकद ही या तरुणांमध्ये आहे. सोशल मिडिया आणि इतरांच्या भावना व्यक्त करण्याचे विविध मार्ग म्हणजे भारतीय लोकशाहीचा एक महत्वाचा भाग म्हणून उदयास येत आहे. हे माध्यम ही विद्यार्थ्यांसाठी खुले आहे. त्यामुळे देशाचे नेतृत्व करण्यासाठी तरुणांना संधी देणे हे एक स्वागतच आहे. त्यामुळे लोकसंख्येचे हित आणि नेतृत्व यांच्यातील संघर्ष कमी होण्याची शक्यता आहे.

शासन म्हणजे लोकशाही अशी साधी सोपी लोकशाहीची व्याख्या असली तरीही लोकशाही ज्या चार खांबांवर उभी आहे. ते खांब मजबूत असणे गरजेचे आहे. नाहीतर समाज विधायक कृत्य अराजकता. विध्वंसक, वर्ग संघर्ष सामाजिक दुष्परिणाम पहायला मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लोकशाही सहभाग वाढवण्यासाठी देशांमध्ये वेगळी छात्र संसदेची संकल्पना ही राबविली जात आहे. त्यामध्येही विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय आहे. आज भारतीय लोकशाही एकस्थित्यंतरातून मार्गक्रमण करत असताना तिच्या यशापयशाच्या तिच्यासमोरील आव्हानांचा साक्षेपाने धांडोळा घेऊन तिच्या

निकोपतेसाठी उपाययोजना सुचवणे हे राज्यशास्त्रांचे अभ्यासकांचे प्रथम कर्तव्य आहे ज्याचा उपयोग भविष्यात विद्यार्थ्यांना होऊ शकतो पण त्याआधी विद्यार्थ्यांनी लोकशाही सुदृढ करण्यासाठीची वाटचाल करत असताना प्रथम विद्यार्थ्यांनी लोकशाही निर्माण का झाली किंवा ती निर्माण करावीशी का वाटली. त्यांचा अभ्यास करणे व त्याचा इतिहास जाणुन घेण्याची गरज आहे.

इतिहासाचा अभ्यास करत असताना हे त्यांच्या लक्षात येईल आपल्याला मिळालेली लोकशाहीची देणगी. मताचा अधिकार प्रत्येक नागरिकाला जाती, रंग, पंथ, धर्म, लिंग किंवा शिक्षणाचा अधिकारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मिळणारी दिली जाणारी वागणुक हे सामाजिक सलोखा टिकण्यासाठी किती महत्वाचे आहे याची प्रचिती येईल. कारण याआधी भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये भांडवलशाहीने हुकुमशाहीने धार्मिक उन्मादाने कसे मानवाचे अधिकार पायमत्ती तुडवले गेले आणि त्यामुळे समाजविधातक कृत्य, अराजकता, विध्वंसक वर्ग, संघर्ष अशा दुष्परिणामांचा सामना करावा लागला. त्यानंतर जगामधील अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन प्रणाली स्विकारली.

ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला विचार स्वातंत्र्य प्राप्त झाले. तो सार्वजनिक बंधने पाळून मुक्तपणे आपले जीवन जगु शकतो. आपल्या हक्काची मागणी करीत असताना नागरिकाने आपल्या कर्तव्यांचे पालन केल. लोकशाही आखिल मानवतेस हितकारच ठरत आली आहे. हे आजच्या विद्यार्थ्यांनी समजुन घेणे गरजेचे आहे. लोकशाही मध्ये आपली भुमिका बजावत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या स्वतंत्र बुद्धीने विचार करावयास हवा. अमुक एका विचारसरणीचा भाग न होता. लोकशाही मुल्ये जपणाच्या दिशेने वाढविण्याच्या दिशेनेच पाऊले टाकली पाहिजे. नव भारताची निर्मिती करण्याकरिता मी प्रथमतः भारतीय आणि अंतिमतः भारतीयच आहे हा बाबासाहेबांनी दिलेला संदेश प्रत्येक विद्यार्थ्यांने लक्षात ठेवल्याच पाहिजेत.

अशाप्रकारे जर युवक आपल्यापूर्ण शक्तीचा वापर करीत असेल तर ते सहजपणे भारतीय लोकशाहीवर ताबा घेण्यास आणि ते पूर्णपणे ओळखू न शकण्यापर्यंत ते बदलू शकते. यामुळे सारे जग भारताकडे पाहील अशाप्रकारे बदल घडवून आणेल आणि भारतीय लोकशाहीमध्ये एक नवीन नेतृत्व, एक नवीन स्थिरता आणि उत्साही बदल घडवून आणेल.

***

## डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम ...

शेवटच्या श्वासापर्यंत मायुभुमीची
सेवा करून धन्य झाला,
देश प्रेम कसं असावं कलाम साहेब तुम्ही
आम्हाला शिकवून गेलात.
देशासाठी विज्ञानाच अफाट वैभव उभ केलं,
स्वतःसाठी कधीच काही नाही तुम्ही साठवलं,
देशप्रेमच तुमचा श्वास होता, महासत्तेचा ध्यास होता,
युवापिढीच्या चैतन्यावर मनोमन विश्वास होता
जात तुमची माणुसकीची होती, धर्म मानवतेचा होता,
भारतमातेच्या कुशीत शिरताना देहावर तिरंग होता.
आमच्या डोळ्यांना तुम्ही स्वप्ने दिली,
अन् अग्नीचे पंख दिले,
विज्ञानाची ताकद देऊन शक्तीमान केले,
देशप्रेमी आणि देशद्रोही यातला फरक त्या दिवशी
प्रत्येकजण पाहत होता,
याकुबचा देह फासावर अन् तुमच्यासाठी पुरा भारत
अश्रु वाहत होता,
तुमच्या जाण्याने प्रत्येक भारतीयांचे मन दुखावले,
पण याकुबच्या जाण्याने सर्वजण सुखावले.
मरण यावे तर देशसेवेत स्वप्न आता बघतो आहोत.
देश महासत्ताकेल्याशिवाय आता गप्प नाही बसणार,
यापुढे मातीच्या कणाकणातुन
तुमची प्रेरणा मिळत राहणार,
आयुष्य तुमच सांगुन गेलं कस जगावं कस मरावं,
जीवात जीव असेपर्यत देश प्रेम कस करावं.

- प्रज्ञा प्रदिप जाधव, **Pre law I**

***

# भय....इथले संपेल का?



श्वेता अभय तेंडुलकर
LLB I

कोपर्डी (जिल्हा अहमदनगर) येथे एका पंधरा वर्षाच्या मुलीवर काही नरधामांनी केलेला अत्याचार आणि त्यानंतर तिचा केलेला खून. हि घटना पेपरमध्ये वाचल्यानंतर अंगावर जणू काटाच उभा राहिला आणि सहज मनात एक विचार येवून गेला, ''भय........इथले संपेल का?''

सध्या अल्पवयीन मुलींवर अनेकवेळा विविध प्रकारचे लैंगिक अत्याचार आणि बलात्कार होत असतात. ज्या वयात तिने आकाशात उंच भरारी घेण्याची स्वप्न पाहायची असतात त्या वयात तिला हिंसक प्रवृत्तीमुळे समाजात मान खाली घालून वावरावे लागते. असे का होते? जी कळी अजून उमललेलीच नाही त्या नाजूक कळीला अमानुषपणे चिरडताना त्या नराधमांना काहीच कसे वाटत नाही.

बलातकारांच्या घटना वृत्तपत्रात वाचल्यानंतर आपल्याला जाणवते की, बलात्कार हा लहान मुलीपासून वयोवृध्द स्त्री वर सुद्धा केला जातो. ह्याचा अर्थ असा की, प्रत्येक पुरुषाच्या नजरेत एखादी स्त्री ही फक्त स्त्रिच असते. मग ती अल्पवयीन मुलगी असो, वा वयोवृद्ध स्त्री त्यांना काही फरक पडत नाही. त्यांची एखाद्या स्त्री कडे पाहण्याची दृष्टी दुषित झालेली असते. ते एखाद्या स्त्री कडे फक्त वस्तूच्या रुपात पाहत असतात. अशी वस्तू जिचा वापर करायचा आणि मन भरले की, तिला फेकून द्यायचं. असे म्हटले जाते. अश्लिलता ही प्रत्यक्षात नसते, ती पाहणाऱ्याच्या नजरेत असते. त्यामुळे पुरुषांनी प्रथम स्त्रियांकडे पाहणाऱ्या आपल्या दृष्टित आणि दृष्टिकोणात बदल करायला हवा. स्त्री आणि पुरुष हि संकल्पना पिढी पुढे नेण्यासाठी बनवली गेली आहे, हे आज माणूस विसरत चाललेला आहे. जेव्हा एखाद्या मुलीवर आपण अत्याचार करतो तेव्हा आपल्याला सुद्धा एक आई, बहिण आहे हे आपल्या कसे काय लक्षात येत नाही? जेव्हा एखाद्या स्त्री वर बलात्कार केला जातो त्यानंतर तिला होणाऱ्या मरण यातना ह्याची आपल्याला जाणीव नसते. ती हॉस्पिटल मध्ये मृत्युशी झुंज देत असते. त्यात तिचा काय दोष असतो? फक्त ती एक मुलगी आहे हा! की अनेक लांडग्यांच्या कचाट्यात ती एकटी मुलगी सापडली म्हणून प्रतिकार करु शकली नाही हा!

'निर्भया' प्रकरणामध्ये चार आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. परंतु त्या प्रकरणात एक बालगुन्हेगार सुद्धा होता. ज्याला वयोअभावी कायद्याने शिक्षा दिली नाही. परंतु ह्या सगळ्यां प्रकरणात तो बालगुन्हेगारच जास्त दोषी होता. आज तो आपल्या वयाचा फायदा घेवून उजळपणे समाजात वावरत आहे. त्याच्या ह्या कृत्याला फक्त वयाअभावी शिक्षा न देण्याचा न्यायालयांचा निर्णय योग्य आहे का? परंतु महात्मा गांधी ह्यांनी एक सुंदर सुविचार सांगितला आहे.

**'Hate the Sin, love the Sinner'**

ह्याचा अर्थ असा की, मानसावर प्रेम करा. त्याच्या वृत्तीवर नाही. जन्मतः कोणताच माणूस वाईट नसतो. वाल्याचा वाल्मिकी होऊ शकतो तर प्रत्येक व्यक्तिला सुधारायची संधी ही मिळायला हवी.

शिक्षा झाल्यानंतर माणूस सुधारतो असे म्हटले जाते. परंतु आज कायद्यामध्ये बलात्कार ह्या अपराधाला फाशीची शिक्षा असूनही दिवसें दिवस

गुन्ह्यांचा आणि गुन्हेगारांचा आकडा वाढतच चालला आहे. ह्याचाच अर्थ असा की, आज मानवाच्या मनात कायद्याविषयी भितीच राहिली नाही. ह्याला कुठेतरी आळा बसायला हवा.

२००५ नंतर कायद्यामध्ये बदल करण्यात आले अणि मुलीला सुद्धा मुलाएवढाच वारसाहक्क प्राप्त झाला. आज मुलगा आणि मुलगी वेगळी नाही. परंतु आज काही ठिकाणी अजूनही मुलीला मुलाच्या मानाने दुय्यम वागणूक दिली जाते. जे चांगलं आहे ते मुलाला आणि उरलेलं मुलीला असं का? तर.... तिला पुढे सासरी जावून शिळ पाक खाण्याची सवय लागावी म्हणून. मुलाच्या मनावर एकच गोष्ट बिंबवली जाते ती म्हणजे तू पुरुष आहेस, तू कायम मुलीपेक्षा वरचढ आहेस, तू घरातील काम करायची नाहीस. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम असा होतो की पुरुष स्वतःला स्त्री पेक्षा श्रेष्ठ समजायला लागतो. आपण करु तो कायदा असे त्याला वाटू लागते. पण हे आज कुठेतरी थांबले पाहिजे. जर स्त्री वर होणारा अन्याय थांबवायचा असेल, तर प्रत्येक पालकांनी ह्याची सुरुवात आपल्याच घरापासून केली पाहिजे. मुलाला आणि मुलीला पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन सुधारेल. जर प्रत्येकाने असाच विचार केला तर त्याला घाबरुन मान खाली घालून तेथून निघून जाण्यापेक्षा त्याच्या समोर त्याला योग्य ते उत्तर देता आलं पाहिजे. कोणतीच स्त्री कमी नसते. फक्त ती समाजाला घाबरुन वावरत असते. पण जेव्हा तिच्या आत्मसन्मानाचा प्रश्न येतो तेव्हा तीच स्त्री दुर्गेच्या विविध रुपातून पुढे येते. जर आज प्रत्येक स्त्री खंबीरपणे उभी राहिली तर कोणत्याच पुरुषाची जिच्याजवळ अश्लिल नजरेने पाहायची हिंमत होणार नाही.

आज इंटरनेटचा प्रमाणापेक्षा जास्त वापर केला जात असतो. **Porn Films** वर भारतामध्ये जरी बंदी घातली गेली असली तरी **Satellite** च्या माध्यमातून इंटरनेटवर सहज ह्या फिल्मस उपलब्ध असतात. फिल्मस् बघूनच एखाद्या अपल्पवयीन मुलाच्या निरागस मनावर परिणाम होत असतो. जेव्हा आपण एखादी गोष्ट सतत पाहत असतो जेव्हा ती गोष्ट आपल्या मेंदूचा ताबा घेत असते आणि निसर्गाचा एक नियमच आहे, वाईट गोष्टी मानवी मेंदू लवकर आत्मसात करतो. म्हणूनच अश्लिल चित्रपट सतत पाहत राहिल्यामुळे त्या मुलाची एखाद्या मुलीकडे पाहण्याची दृष्टी पण अश्लिल झालेली असते. आपण काय करत आहोत? कोणासोबत करत आहोत? ह्याचा सारासार विचार करण्याच्या पलिकडे तो गेलेला असतो. म्हणूनच हे कुठेतरी थांबायला हवे. त्यासाठी काही संस्थानी स्वतः पुढाकार घेवून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे. जेणेकरुन योग्य तो संदेश लोकांपर्यंत पोहचू शकेल.

शाळा, महाविद्यालयामध्ये योग्य ते शिक्षण दिले गेले पाहिजे तसे वैद्यकीय दृष्ट्या त्याचा आपल्या शरिरावर काय परिणाम होऊ शकतो ह्याबद्दलचे सुद्धा प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. मुलींच्या संरक्षणासाठी संस्था स्थापन केली पाहिजे आणि त्यात महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. जर कोणत्याही मुलीला कसल्याही प्रकारची अडचण आली तर ती न घाबरता आपला प्रश्न महिला कर्मचाऱ्यांसमोर मांडू शकेल.

मुलींना त्यांच्या स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. तसेच कराटे, ज्युदो ह्यांसारख्या स्वसंरक्षणात्मक खेळांचे सुद्धा मुलभूत ज्ञान प्रत्येक मुलीला दिले गेले पाहिजे. प्रत्येक मुलगी ही स्वतःचे संरक्षण स्वतः करु शकेल एवढी तरी सक्षम झालीच पाहिजे.

जर प्रत्येक पुरुषाने असा विचार केला की, ह्या समाजातील प्रत्येक स्त्रीचे संरक्षण करणे ही माझी जबाबदारी आहे, तर कोणतीच स्त्री मृत्यूला कवटाळणार नाही, म्हणूनच स्त्री च्या संरक्षणासाठी पुरुषांनी पुढाकार घेऊन हेल्पलाईन क्रमांक प्रत्येक स्त्रियांपर्यंत कसे पोहचतील ह्याची काळजी घेतली

पाहिजे. रात्रीचा प्रवास करत असताना सुद्धा तिला बिनधास्तपणे वागता आलं पाहिजे.

आपल्याला मुलगी झाली म्हणून आईवडिलांनी नाखूष न होता त्या मुलीला मुलाएवढंच सक्षम बनवलं पाहिजे. आज मुली कोणत्याच क्षेत्रात कमी नाहीत. मुलांच्या बरोबरीने त्या प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. म्हणूनच प्रत्येकाला संविधानाने अनुच्छेद २१ नुसार बहाल केलेला जीवन जगण्याचा अधिकार त्या मुलीला मुलाएवढाच मिळायला पाहिजे. जर मुली सन्मानाने जगू शकल्या तर अब्दुल कलामांच भारताला २०२० साली महासत्ता बनवण्याचं स्वप्न प्रत्यक्षात यायला अवकाश लागणार नाही.

''मुलगी झाली म्हणून बाळगू नका भीती,
गुणवान मुली ही तर देशाची संपत्ती''

# आठवण

एकही दिवस असा जात नाही की
तुझी आठवण येत नाही...........
दिवसाचा प्रत्येक क्षण येतो
तुझी आठवण घेऊन आणि
जातो सुद्धा आठवण देऊन .............
प्रत्येक क्षणांमध्ये मला तुच दिसतेस
फक्त तुझी सावलीच दिसते
तु कुठेच नसतेच..........
श्वास घेतो तेव्हा तुच असतेस, अन्
श्वास सोडतो तेव्हाही
तुच दिसतेस.............
एखाद्याची आठवण अशीही येते की
श्वास घेणं आवघड होऊन बसतं
एखाद्या दिवशी आठवण आली नाही
तर जगणं अवघड होऊन बसतं..........

**- प्रशांत रामचंद्र गोसावी**
**LLB II**

***

# आई

लेकरांची आई अन्  आईचं लेकरू
गायीच्या पायाशी लगडलेले वासरू
गंगा जान्हवी समा शाबूत अन् पवित्र हे नाव
जशी चंद्राची रात्रीला तशीही आई लेकरांची साथ
तिच्या मनाची त्याच्या मनाशी जुळलेली वाणी
भाबड्या या प्रेमाची अजब कहाणी
उबदार कुशीतला उबदार आसरा आजीवन
पुरवणारा मायेचा गाभारा
आई मायेचा सागर ,प्रेम दिव्याचा जागर
शीतल तुझा आसाराम मला हवा जीवनभर
तिच्या प्रांजल हृदयी असतात
मधु स्नेहाच्या खाणी
अन भाबड्या या प्रेमाची अजब कहानी
माया मोल नाही तिथे ना मोल तिच्या प्रेमाची
आई नावाचे दैवत आहे स्वामी सारया जगाचे
आई दोन शब्दांची सांगड
अवध्या जगाला पुरून उरते
लेकरांच्या खुशी साठी
ती दररोज तीळ तीळ मरते
लेकरासाठी जीवनभर
स्पर्धांत ती अडतीची लॉराची गाणी
अन् भावड्या या प्रेमाची अजब कहाणी
आई . . .आई . . .आई . . .लेकराचा भार
स्वत:साठी इच्छा आकांक्षांचे कोकणी मात्र रिते
आपल्या बछड्यांच्या रक्षणासाठी
ही रणरागिणी रणरणते
ती जळती वाती सारखी अन् आयुष्यभर
बघवत नाही अशा या देवतेला
त्याच्या डोळ्यातलं पाणी
पण हे खरं आहे भाबड्या
या प्रेमाची अजब कहाणी

**- कु. कल्याणी केराप्पा साळुंखे**
**V NLC**

***

पाहिजे. रात्रीचा प्रवास करत असताना सुद्धा तिला बिनधास्तपणे वागता आलं पाहिजे.

आपल्याला मुलगी झाली म्हणून आईवडिलांनी नाखूष न होता त्या मुलीला मुलाएवढंच सक्षम बनवलं पाहिजे. आज मुली कोणत्याच क्षेत्रात कमी नाहीत. मुलांच्या बरोबरीने त्या प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. म्हणूनच प्रत्येकाला संविधानाने अनुच्छेद २१ नुसार बहाल केलेला जीवन जगण्याचा अधिकार त्या मुलीला मुलाएवढाच मिळायला पाहिजे. जर मुली सन्मानाने जगू शकल्या तर अब्दुल कलामांच भारताला २०२० साली महासत्ता बनवण्याचं स्वप्न प्रत्यक्षात यायला अवकाश लागणार नाही.

''मुलगी झाली म्हणून बाळगू नका भीती,
गुणवान मुली ही तर देशाची संपत्ती''

# आठवण

एकही दिवस असा जात नाही की
तुझी आठवण येत नाही............
दिवसाचा प्रत्येक क्षण येतो
तुझी आठवण घेऊन आणि
जातो सुद्धा आठवण देऊन ..............
प्रत्येक क्षणांमध्ये मला तुच दिसतेस
फक्त तुझी सावलीच दिसते
तु कुठेच नसतेच..........
श्वास घेतो तेव्हा तुच असतेस, अन्
श्वास सोडतो तेव्हाही
तुच दिसतेस.............
एखाद्याची आठवण अशीही येते की
श्वास घेणं आवघड होऊन बसतं
एखाद्या दिवशी आठवण आली नाही
तर जगणं अवघड होऊन बसतं..........

- प्रशांत रामचंद्र गोसावी
LLB II

***

# आई

लेकरांची आई अन् आईचं लेकरू
गायीच्या पायाशी लगडलेले वासरू
गंगा जान्हवी समा शाबूत अन् पवित्र हे नाव
जशी चंद्राची रात्रीला तशीही आई लेकरांची साथ
तिच्या मनाची त्याच्या मनाशी जुळलेली वाणी
भाबड्या या प्रेमाची अजब कहाणी
उबदार कुशीतला उबदार आसरा आजीवन
पुरवणारा मायेचा गाभारा
आई मायेचा सागर ,प्रेम दिव्याचा जागर
शीतल तुझा आसाराम मला हवा जीवनभर
तिच्या प्रांजल ह्रदयी असतात
मधु स्नेहाच्या खाणी
अन् भाबड्या या प्रेमाची अजब कहानी
माया मोल नाही तिथे ना मोल तिच्या प्रेमाची
आई नावाचे दैवत आहे स्वामी सारया जगाचे
आई दोन शब्दांची सांगड
अवघ्या जगाला पुरून उरते
लेकरांच्या खुशी साठी
ती दररोज तीळ तीळ मरते
लेकरासाठी जीवनभर
स्पर्धांत ती अडतीची लॉराची गाणी
अन् भावड्या या प्रेमाची अजब कहाणी
आई . . .आई . . .आई . . .लेकराचा भार
स्वत:साठी इच्छा आकांक्षांचे कोकणी मात्र रिते
आपल्या बछड्यांच्या रक्षणासाठी
ही रणरागिणी रणरणते
ती जळती वाती सारखी अन् आयुष्यभर
बघवत नाही अशा या देवतेला
त्याच्या डोळ्यातलं पाणी
पण हे खरं आहे भाबड्या
या प्रेमाची अजब कहाणी

- कु. कल्याणी केराप्पा साळुंखे
V NLC

***

# कर्जामधील महाराष्ट्र

ऐश्वर्या राजेंद्र सदाफळे
III NLC

वित्तिय तुट म्हणजे अग्नीप्रमाणे उत्तम नोकर मात्र दृष्ट मालक : बी. आर. शेणॉय

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताच्या आर्थिक प्रगतीत मोलाचे योगदान देणारे अर्थतज्ञ शेणॉय यांनी वित्तिय तुटीची संकल्पना त्याचे फायदे आणि तोटे अगदी योग्य शाब्दित चौकटीत बसवले आहेत.

विकसनशील देशांमध्ये नेहमीच तुटीचा अर्थसंकल्प मांडला जातो. ज्यामुळे बाजारातील चलनपुरवठा वाढून वस्तू व सेवांची मागणीही वाढते. यामुळे मर्यादित चलनवाढ (**Controlled demondpull inflation**) होऊन अशी चलनवाढ उत्पादक वर्गाला वस्तू आणि सेवांच्या निमिर्तीस उत्तेजित करते ज्यामुळे रोजगारनिर्मिती, कर संकलन, जिडीपी इ. च्या वाढीस मदत होते. म्हणून वित्तय तूट अनियंत्रित अमर्यादा झाली तर मात्र प्रचंड चलनवाढ होऊन संपूर्ण समाज महागाईच्या आगीत होरपळू शकतो. म्हणूनच शेणॉय तिला दूष्ट मालक असेही म्हणतात.

प्रगतीशील राज्य, उद्योग-व्यवसायाचं माहेरघर बिरध्द मिळवणाऱ्या महाराष्ट्राच्या आर्थिक वृद्धी दर वर्षेगणिक घसरत चालला आहे २००५ ते २०१४ या काळात ८.९८% पासून तो २०१४-२०१५ मध्ये ५.६६% इतका घसरला आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या इझ ऑफ डुईंग बिझनेस, मध्ये एकेकाळी अव्वल स्थानावर असणारा महाराष्ट्र १० व्या स्थानावर फेकला गेला आहे. लाल फितीमध्ये अडकून पडलेले उद्योग तसेच सरकारचे आळशी धोरण यास कारणीभूत ठरले. सततचे दुष्काळ आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याएवजी त्याचे केले जाणारे राजकारण अशा कित्येक गोष्टी महाराष्ट्राच्या अधोगतीस कारणीभूत आहेत. वृद्धी दर ज्या वेगाने घसरत आहे. त्याच वेगाने वित्तिय तूट आणि परिणामी सरकारच्या डोक्यावरील कर्जाचे ओझं वाढत चालल आहे.

वित्तिय तूट वाढण्यामागे सरकारचे कुचकामी धोरण प्रामुख्याने कारणीभूत आहे. हा वाढीव खर्च शाश्वत योजना आणि विकासकामांवर होण्याऐवजी तात्पुरत्या, कामचलाऊ योजनांवर खर्च झाल्याने सरकारची मालमत्ता (**Assets**) भरीव प्रमाणात न वाढता कर्ज मात्र वाढत गेले. याला मुख्य कारण म्हणजे केंद्र सरकार आणि १४ व्या वित्त आयोगाकडे असणारा दूर दृष्टीचा अभाव. केंद्रीय वित्त आयोगाने (१४ व्या) क्षैतिज विभागणी (**horizontal devolution**) करताना राजकोषीय शिस्त (**Fiscal discipline**) या निर्कषाला असणारे १४ मूल्य (**Weightage**) काढून टाकले. त्यामुळे राजकोषीय शिस्त पाळण्याबाबत सर्वच राज्यांनी उदासनीता दाखवली. स्वतः प्रेरित होऊन राज्यांनी राजकोषीय शिस्त पाळण्याबाबत असणारे एकमेव आकर्षण आले. केंद्र सरकारने कर विभागीय पैकी ३२% ऐवजी ४२% म्हणजे १०% ज्यादा हिस्सा राज्यांना देण्यात आले असे असूनही वित्तीय तूट कमी होण्याऐवजी वाढत आहे. हे खरे पाहता आश्चर्याची आणि गांभीर्याची बाब आहे. महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने देशाच्या आर्थिक स्थिती मध्ये आणि वित्तीय तुटमध्ये सुधारणा न होण्यामागे दुसरे मुख्य कारण म्हणजे अत्यंत कमकुवत आणि दुबळा असा राजकोषीत दायित्व आणि अंर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायदा (**FRBM act**) या कायद्यानुसार राजकोषीय तूट २००९ पर्यत ३% पर्यत आणि महसूली तूट शून्य

टक्यांवर आणणे अशी लक्ष्ये ठेवण्यात आली पण २०१७ जाइनही सरकारला ही लक्ष्ये गाढता आली नाहीत. मग सतत कायद्याला सतत दूरुस्ती करुन या कायद्यानुसार वित्तीय तूट शून्य करण्याऐवजी या कायद्याची उपयोगिताच शून्य करूनच टाकण्यात आली. यामागील मुख्य कारण म्हणजे या कायद्याचे उल्लघन करण्यास कारवाई म्हणून कोणत्याच ठीक तरतूद करण्यात आली नाही. सध्या महाराष्ट्राची राजकोषीय तूट २०१६-२०१७ इतकी आहे पण या राज्यांच्या तसेच देशांच्या जिडीपी किंवा अन्य आकड्यावरुन परिस्थितीचे भयावाह चित्र जे दिसते आहे त्याहीपेक्षा कितीतरी गंभीर परिस्थिती अर्थव्यवस्थेची आहे हे नक्की. जिडीपी मोजण्याच्या पद्धतीत केलेल्या बदलामुळे दिसणारे फुगलेले आकडे यावर जागतिक बँक (**World Bank**) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (खचऋ) तसेच अन्य पतमानाकांन संस्था या सर्वानीच या आकडे मोजण्याच्या पद्धतीबाबत साशंकता व्यक्त केली आहे. याचा परिणाम परकीय गुंतवणूक उत्पादन क्षेत्र तसेच अन्य क्षेत्रांवरही याचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

या सगळ्यावर ठोस उपाययोजना केल्या नाहीत तर १९९१ सारखी आर्थिक दिवाळखोरीची वेळ येण्यास वेळ लागणार नाही आणि आपली पत वाचवण्यासाठी पुन्हा रिझर्व्ह बँक आपला सर्वणसाण खचऋ कडे गहाण ठेवावा लागेल. शिवाय जागतिक स्तरावर आर्थिक महासत्ता होऊ पाहणारा देशाची आपली नाचक्की होईल ती वेगळीच. या समस्यांवर एक चांगला उपाय म्हणजे सरकारचे उत्पन्न वाढवणे, ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कॉपरेशन अँड डेव्हलपमेंट (OELD) चा **Base Erosion and Profit Sharing** हो प्रोझेक्ट भारतात तातडीने अमलात आणणे गरजेचे आहे. करांचा पाया वाढवणे तसेच कर चुकवेगिरीला आळा घालून सरकार आपले उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढवू शकते. २०१२-२०१३ च्या आकडेवारीनुसार फक्त १% लोकच आयकर भरतात. जागतिक आयकर भरण्याची ही संख्या खूपच कमी येत असून हे एक उदाहरण आहे. मोठमोठ्या कंपन्या या कायद्यातील त्रुटी शोधून कर भरण्यापासून पळवाटा शोधतात. (**Tax Avoidance**) अशी प्रकरणे होऊ नये म्हणून **GAAR** ची अंमलबजावणी मध्ये चालढकल करून चालणार नाही. पी नोट्स सारखे गुप्तवळीचे मार्ग जे भ्रष्टाचार आणि हवाला रॅकेट सारख्या गोष्टींना प्रोत्साहन देतात यांच्यावर केवायसी (**Know Your Customer**) बंधने लादने गरजेचे आहे.

हे मार्ग सरकारचे उत्पन्न वाढवू शकतील अन् खर्चाच्या बाजूने कपात करणे हि सुद्धा सरकारची जबाबदारी आहे लागोपाठ येणाऱ्या निवडणूका त्यासाठी सरकारी तिजोरीतून निवडणूकांवर आणि जाहिराती बाजीवर होणारा अफाट खर्च थांबण्यासाठी खर्च कमीची गरज आहे.एक भारत एक निवडणूक ही प्रकिया अंमलात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. तसेच **Digital India** च्या साहाय्याने जास्तीत जास्त कार्यक्षमता निर्माण करणेचे गरजेचे आहे. आज किती तरुण बेरोजगार आहेत त्याना रोजगार दिला तरच लोकसंख्या लाभांश, आपल्याला उपयोगात आणला पाहिजे. 'मेक इन इंडिया' सारखे भव्य दिव्य कार्यक्रम (मुंबई मध्ये फ्रेबुवारी २०१५ मध्ये झाला तसा) घेऊन त्यावर कोट्यावधी रुपयांचा चुराडा तेही त्यावेळी राज्य दुष्काळ ग्रस्त असताना करणे कितपत योग्य आहे ते सरकारनेच ओळखावे. मोठे रक्कम घेतल्याने गुंतवणूक वाढत नाही तर उद्योगांच्या वाढीसाठी पोषक सोयी, सुविधा दिल्याने ती वाढेल हे जर आता सरकारला शिकवावे लागत असेल तर यासारखे बौद्धीक दिवाळखोरीचे लक्षण नाही.

परिस्थितीचे भान राखून कंबर कसली आणि काटेकोरपणे नियोजन अंमलात आणले तर महाराष्ट्राचा कर्जाचा बीजा निश्चितच कमी होऊ शकेल आणि मग खऱ्या अर्थाने म्हणता येईल. 'अच्छे दिन दूर नही' !

# जीवन - एक चित्रपट



पुजा विलास गोटखिंडे
LL.B. II

जीवनाविषयी लोकांचे अनेक पद्धतीचे दृष्टीकोन असतात. प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगळा असतो. विचार करण्याची पद्धत वेगळी असते. म्हणजे जीवनाला भले ही सीमेवृष्टी असो वा नसो कुणीही त्याला सोडलेले नाही.

म्हणजे हिंदी चित्रपट असो की ज्यामध्ये असं म्हटलं जात ''जिंदगी प्यार का गीत है ।
उसे हर दिन तो गाना पडेगा ।।
असे असो....किंवा मग
।।जिवन इसका नाम है –प्यारे तुझे तो आगे चलना है ।। असे असो .....किंवा मग लोकप्रिय 'मुकंदर का सिकंदर' मधलं'
जिंदगी तो बेवफा है एक दिन ठुकराएगी।
मौत मेहबुबा है अपने साथ लेकर जाएगी ।
मर के भी जिने की अदा जो सिखलाएगा ।
वो मुकंदर का सिकंदर कहलाएगा ।।
असं बरचं काही जीवनाबद्दल वर्णन केलं जातं.

कुणाच्या मते जीवन हे क्षणभुंगूर आहे तर कुणाच्या मते ते खूप जास्त अनमोल आहे. त्यासाठी आपण जीवनाबद्दल कसा विचार करतो हे जास्त महत्वाचं आहे.

''आपण किती जगतो–यापेक्षा कसं जगतो'' याला जास्त महत्व आहे असं मला वाटत. कारण प्रत्येकांची विचार करण्याची पद्धत वेगळी असते. आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा असतो. काही जणांचा सकारात्मक दृष्टीकोन असतो. सकारात्मक म्हणजे ''जिंदग जी रहा हूँ'' आणि काही जनांचा नकारात्मक दृष्टीकोन असतो. म्हणजे ''जिंदगी काट रहा हूँ'' म्हणूनचं मराठीत असं म्हटलं जातं की, ''जीवन जगावं कणतं–कणतं की मग गाणं म्हणतं'' हे आपल्याचं हातात असतं.

मला असं वाटतं की ज्याला जीवनाचा अर्थ समजला तोचं खरं आयुष्य जगला. कारण वयाचे अनेक टप्पे येत असतात. यामध्ये खास करुन १६ वे वर्ष धोक्याचं असं म्हटलं जातं. पण मी तर असं म्हणेन की १६ व वर्ष मोक्याचं. कारण हे आलचं नव्हे तर १२ व्या शतकामध्ये ज्ञानेश्वरांनी सिद्ध केलेलं आहे. कारण ज्यांच्या एक–एक ओवीवरती M.A., M.Phil, Phd. केली जाते. असा अखंड ओवींचा संपूर्ण संग्रह असलेली परीपूर्ण अशी ज्ञानेश्वरी ज्ञानेश्वरांनी याच १६व्या वर्षी लिहिला. म्हणूनच ते मोक्याच आहे. असं मला वाटतं. या जगात अशक्य अशी कुठलीच गोष्ट नाही. फक्त करण्याची तयारी आणि स्वतःवर विश्वास पाहिजे.

जीवनं –दुःखात रहा किंवा सुखात–गरीबीत रहा किंवा श्रीमंतीत रहा वेळ कुणासाठीचं थांबणार नाही म्हणजे प्रत्येक अनमोल क्षण जसे फुलपाखरे किंवा मधुकण गोळा करणाऱ्या माशा आपल्या एका ध्येयासमोर एकरुप होऊन जगतात. ध्येयासक्त लोक आपल्या ध्येयाने मारुन अनेक अशक्य गोष्टींवर मात करून आपलं जिवनं यशस्वी करतात.

आता सध्या अनेक माध्यमातून म्हणजे What's app असो किंवा Face book असे म्हणजे मिडीया तून जीवनावर अनेक पोस्ट टाकल्या जातात. पण मला असं वाटतं की नुसत्या पोस्ट टाकून उपयोग नसतो पण त्या पोस्ट व्यक्तीशः आपण कसं जगतो याला जास्त महत्त्व आहे.

जीवन म्हणजे काही एक प्रकारचा चित्रपट नव्हे की ज्यामध्ये संवाद चुकला किंवा शुटींग चुकलं

की ज्यामध्ये Retake म्हणून परत तो इशशप आपण घेऊ शकतो. पण जीवन हा एक असा चित्रपट आहे की जिथे आपण आपल्या आयुष्यातला एखादा इशशप डिलीट करु शकतो किंवा व्रशींळीश करू शकतो असं अजिबात नाही. त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा विचार करूनचं निर्णय घेतला पाहिजे अस मला वाटतं.

जीवन विद्या मिशन चे 'वामनराव पै' यांच्या वाक्याची मला फार प्रकर्षाने आठवण येते. कारण एकाच वाक्यामध्ये त्यांनी स्वतःच्या आयुष्याचं काय करायच आहे हे अत्यंत सोप्या आणि मापक शब्दात त्यांनी सांगितले आहे आणि ते म्हणजे............

''तुच आहेस तुझ्या जिवनाचा शिल्पकार''

या एकाचं वाक्यात त्यांनी आयुष्याचा खूप मोठा अर्थ सांगितला आहे. आत्ता जे तुमच्या हातात आहे तेच जीवन उद्या नाही. म्हणजे उद्या करायचं ते आजचं करा. आणि आज करायचं ते आत्ताचं करा...बघा......यश तुमचचं आहे आणि मला तर असं वाटत की आयुष्य खूप सुंदर आहे. अनेक संतांनी असं सांगून ठेवलयं की, ''जीवन हे क्षणभुंगूर आहे'' इथे ''नाही उद्याचा भरोसा'' त्यामुळे जीवनातल्या लहानातल्या लहान गोष्टीचा सुद्धा आनंद घेऊन जगा. म्हणजे मला तर असं वाटत की जेवताना सुद्धा आपण प्रत्येक घासाचा आनंद घेऊन जेवलं पाहिजे. ना की फक्त पोट भरण्यासाठी जेवलं पाहिजे.

मला आत्ता या क्षणी जीवनाचा अर्थ स्पष्टपणे समजून सांगणाऱ्या दोन कवितेच्या ओळी आठवतात. त्या म्हणजे

।।जीवनाची गाडी थोडी विचाराने हाक रे
वाट खाच –खळग्याची नको डोळे झाकू रे ।।

***

# एक विनंती आहे

एक विनंती आहे
दुर जायचे असेल तर
जवळच येऊ नकोस
बिझी आहे सांगुन टाळायचं असेल तर
वेळच देवू नको..........!
एक विनंती आहे
साथ सोडून जायच असेल तर
हात पुढे करुच नको........
मनातुन नंतर उतरवायचं असेल तर
मनात आधी भरुच नको........!
एक विनंती आहे
चौकशी भरे कॉल काळजीवाहू एसएमएस यांचा कंटाळच
येणार असेल तर
कोणाला नंबर देऊ नको
मेमरी फुल झालीये सांगुन
डिलीटच करायचं असेल तर .........
नंबर सेव्ह च करु नको............!
एक विनंती आहे
माझ्या काळजी करण्याचा त्रासच होणार असेल तर.......
आणि, अनोळखी होऊन वागायचं असेल तर............
माझ्याबद्दल सगळं जाणुन घेऊच नको.............!
एक विनंती आहे
आर्ध्यावर सोडून जायचं असेल तर..............
आधी डाव मांडुच नको.................!
एक विनंती आहे
सवयच होईल म्हणून तोडायंच असेल तर.........
कृपया नातं जोडू नको
फाडून फेकून द्यायंच असेल तर ......
माझ्या मनाचं पान उलगडूच नको...........!

- बजरंग पाडुरंग गायकवाड
**IV NLC**

***

# आयुष्य



समृध्दी प्रशांत नार्वेकर
Pre Law I

माणूस राग जितक्या सहजतेने व्यक्त करतो तितक्या सहजतेनं प्रेम ही व्यक्त करु शकला असता तर जगायला खरच किती मज्जा आली असती ना कारण माणसाच्या निम्या समस्या ह्या व्यक्त केलेल्या रागामुळे आणि कधीच व्यक्त न केलेल्या प्रेमामुळे वाढतात. शब्द बोलताना शब्दाला धार नको तर आधार असला पाहिजे. कारण धार असलेले शब्द मन कापतात आणि आधार असलेले शब्द मन जिंकतात.

निर्णय चुकतात आयुष्यातले आणि आयुष्य चुकत जातं. सोडवताना वाटतं सुटत गेला गुंता पण प्रत्येक वेळी नवीन गाठ बनत जाते. प्रश्न कधी कधी कळत नाहीत आणि उत्तर मात्र चुकत जाते. दाखणाऱ्याला दिसतात तितक्या सोप्या नसतात गोष्टी, अनुभव म्हणजे काय हे तेव्हाच कळते.

असे मित्र बनवा जे कधीच साथ सोडणार नाही, असे ही प्रेम करा ज्यात स्वार्थ असणार नाही, असे हास्य बनवा ज्यात रहस्य असणार नाही, असा स्पर्श करा ज्याने जखम होणार नाही, असेही हृदय बनवा ज्याला तडा जाणार नाही, आयुष्यात असे लोक जोडा जे वेळ आली की तुमची सावली आणि वेळेला तुमचा आरसा बनतील कारण आरसा कधी खोट बोलत नाही आणि सावली, कधी साथ सोडत नाही.

व. पु. काळे म्हणतात कोणी कसं दिसावं याच्या पेक्षा कोणी कसं असाव याला महत्त्व आहे. ते शक्य नसेल तर जास्तीत जास्त कस नसावं याला तरी नक्कीच महत्त्व आहे. स्वप्न पूर्ण झाल नाही तर रडायच नसतं. रंग उडाले म्हणून चित्र फाडायच नसतं. फक्त लक्षात ठेवायच असत सर्वच काही आपल नसतं, आपल्या दुःखात कदाचित दुसऱ्याच सुख असतं, छोट्याशा आयुष्यात खुप काही हव असत, पण पाहिजे तेच मिळत नसतं, असंख्य चांदण्याणी भरून सुद्धा आपलं आभाळ रिकामी असत. हव्याअसलेल्या सगळ्याच गोष्टी माणसाला मिळत नसतात. पण न मिळणाऱ्याच गोष्टी माणसाला का हव्या असतात? याच उत्तर सुरेश भट यांनी सांगितल आहे. आयुष्य छान आहे, थोड लहान आहे. रडतोस काय वेड्या लढण्यात शान आहे. काट्यात ही फुलांची झुलती कमाण आहे. उचलून घे हवेत दुनिया दुकान आहे. जगणे निरर्थक म्हणतो तो बेईमान आहे. सुखासाठी कधी कधी हसाव लागत तर कधी कधी रडाव लागता, कारण सुंदर धबधबा बनायला पाण्यालाही उंचावरुण पडाव लागत, चार चौघात बसण्यापेक्षा कधी कधी समुद्र किनाऱ्यावर जाऊन बसाव आठवणींना घेऊन बसाव, आयुष्य जास्त सुंदर वाटत. आपल्याला कोण हवय या पेक्षा आपण कुणाला हवोय याचा सुद्धा कधी तरी विचार करायचा असतो. आकाशातले तारे कधीच मोजू शकत नाहीत आणि माणसांच्या गरजा कधीच संपत नाहीत, शक्य तेवढे तारे मोजून समाधानी रहावे आयुष्य जास्त सुंदर वाटत.

आयुष्यातील सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आनंद. गंमतीची गोष्ट अशी की आपल्या पैकी बऱ्याच लोकांना आयुष्य संपेपर्यंत त्यांचा पताच नसतो. उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाला आनंदाने समोर जा मावळताना तो तुम्हाला खुप समाधान देऊन जाईल आनंद हा फुलपाखरा सारखा असतो. त्याचा पाठलाग केला की तो दुर पळतो व आपण निश्चित बसलो की आपल्या खांद्यावर बसतो. प्रश्न

सुटण्यासारखा असेल तर काळजी नसेल तर काळजी करुन उपयोग काय? पराभावाने माणूस संपत नाही. प्रयत्न सोडतो तेव्हा तो संपतो. कठीण काळात सतत स्वतःला सांगा की शर्यत आजून संपलेली नाही कारण अजून मी जिंकलेलो नाही.

''छुले आसमा जमीन की तलाश ना कर
जिले जिंदगी खुशी को तलाश ना कर
बदल जायेगी तकदीर खुद ही मेरे दोस्त
मुस्कूराना सिखले वजाह की तलाश ना कर
महशूर होना लेकीन कभी मगरुर मत होना
छु लो कामयाबी के कदम
लेकीन कभी अपनो से दूर मत होना
जिंदगी मे खुब मिलजायेगी दौलत और शौहरत
पर आखिर अपने ही अपने होते है
ये बात कभी भूल मत जाना''

***



– अश्विनी बी. कांबळे

Pre Law I

# ए आई


ए आई ओळखलस का गं मला,
ऐकलस का ग मला,
मी तुझ तेच बाळ ज्याची जन्मघेण्याआधीच तोडून
टाकलीस तू नाळ
मला यायच होत गं या जगात
उडायच होत उंच मोकळ्या आकाशात
नको बनवू तू मला जिजाऊ, सावित्रीबाई,
पण मुलगी होण्याचा हक्क हिरावून
घेऊ नकोग गं आई.
तू मला सगळ दिलस जे मला
तुझ्या पोटात हवं होत,
मग आत्ताच का मला नाकारलस
जेव्हा मला तुला पहायच होत.
मायेचा पदर पांघरुन मला तुझ्या पोटाशी
बिलगायचं होत,
बाबांचा सन्मान होऊन मला
या जगाशी लढायचं होतं.
आजीच्या कुशीतल्या राजवाड्यात झोपायचे होते.
आजोबांचा चष्मा पळवून गोड धप्पाटे खायचे होते.
शिवरायांच्या तलवारीप्रमाणे वाईट नजर
टाकणाऱ्यांवर बरसायचे होते.
आई तुझ्या संस्कारांसोबत
दोन कुटुंबातील दुवा व्हायचे होते.
हा विचार करताना तुझे मायेचे हात
आत्ताच तर जाणवत होते.
पण खरं सांगू आई....मला हे खरोखर अनुभवायचे
होते खरोखर अनुभवायचे होते.....
तुझीच अप्रिय ठरलेली न उमललेली कळी.

– शिवानी नानासो जाधव

**Pre Law I**

***

# नाटक



यश सुहास हेगडे-पाटील
LL.B. I

नाटक म्हणजे नेमकं काय? ह्याचा शोध अनेक नाटककारांनी लावलेला आहे. ज्यांना माहीत करून घ्यायचा आहे त्यांनी stanyslavasky, Breakth etc, लोकांची पुस्तके वाचावीत, आणि माहीती करून घ्यावी. माहीत करून घेणं तुमचं काम. माझं काम हे आहे, की ही कला भ्रष्ट कशी झाली यावर प्रकाश टाकणे. तर ह्या गोष्टीची चर्चा आपण एकदम सुरुवातीपासून करु.

नाटक कसं सुरु झालं?

प्रथम प्रजोत्पत्तीपासून नाटकं सुरु आहे. माणसाला ज्यावेळी बोलताही येत नव्हतं तेव्हापासून नाटक सुरु आहे.

नाटकाचा Form कसा होता?

ज्यावेळी माणसाला बोलता येत नव्हतं. त्यावेळी हातवारे करून, इशारे करून दुसऱ्या व्यक्तीला तो त्याचा अनुभव, सांगत असे, गोष्ट सांगत असे. उदा. ''की मी जंगलात शिकारीला गेलो होतो, तिथे मला रानडुक्कर दिसला, मी दगड घेतला आणि घातला त्याच्या डोक्यात'' आणि हे सगळं तो ॲक्ट. करून सांगायचा, हातवारे करून सांगायचा. नंतर माणासाला बोलायला येवू लागलं. मग त्याने कथाकथन सुरु केलं. लोकांना गोष्ट सांगायला लागलो ते पण रंगवून. It is nothing but वाचीक अभिनय. मग तो आधी एका माणसाला सांगे, जर त्याला आवडली गोष्ट, तर तो माणसं जमवून गोष्टी सांगायला लागला. हा असा form भरपूर वर्ष चालला, साधारण माणसं जंगली होती, तोपर्यंत. नंतर माणसांनी शहर वसवली, मग ह्या नाटकाचा Form सुधारु लागला. कथाकथनामध्ये, अभिनय, नृत्य, संगीत आलं. नाटक वेगवेगळ्या गोष्टींवर असायच्या (पौराणीक कथाच असायच्या) ह्या नाटकात संभोगदृष्येही असायचे. ऐकून धक्का बसला असेल, पण हो. पुर्वी रंगमंचावर संभोगदृष्ये दाखवले जायचे. यनविधीत सुद्धा संभोगाचे नाटक केले जायचे, ह्याचं उत्तम उदाहरण म्हणजे अश्वमेध यज. हा यज्ञ नाटकाच्या Form मधेच आहे. हे नाटक साम्राज्य, राष्ट्र, संपत्ती वीर्यशाली प्रजा प्राप्तव्हावी एतदर्थ अश्वमेघ यज्ञ करण्याचा प्रघात असे. यज्ञात स्त्रीपुरुष असा सर्वप्रकारचा समाज जपे. अध्वर्यु, उद्‌गातृ, होता असे ऋत्विज पुरुष असत व महर्षी, यजमान, पत्नी इत्यादी स्त्रिया असत. पैकी वीर्यशाली प्रजा उत्पन्न व्हावी या कामनेच्या सिद्धार्थ नाटक केले जात असे. (हा तपशील, यनुसंहितेत दिलेलं आहे) तर साधारण जोपर्यंत माणसं`शिप ळपवशव होती, वैचारीक विकास झालेला असायचा, तोपर्यंत हे नाटकचे Forms होते. नंतर माणसाची बुद्धी भ्रष्ट करायचं काम आपल्या थोर लेखकांनी केलेलं आहेच. त्यात १ ला नंबर येतो भरतमुनीचा, ज्याने नाट्यशास्त्र लिहीलं (मला शंका आहे, की खरंच त्याने लिहीली का? तर जाऊ दे, आपण त्यानेच लिहीली असं समजु) तर त्याने रंगमंचावर काय करायचं आणि काय नाही करायचं हे लिहीलं. (ethics ठरवले)म्हणजे काय केलं? तर नाटक ह्या कलेच रीतसर आणि पद्धतशीर वाट लावली. त्यात मग त्याने वर्ण भेद आणला/सुरु केला. उदा: राजाची भूमीका क्षत्रीय माणसानेच करायची, पुजाऱ्याची भूमीका ब्राह्मणानेच करायची, असे काही फालतु नियम बनवले गेले. ह्या नाटकांचा उद्देश फक्त आणि फक्त entertainment असायचा म्हणजे Dirty Picture आणि त्या काळातले नाटक ह्यात काहीच फरक नाही.

इथुन पुढे; किंवा या काळानंतर जर आपण बघीतलं, तर माणसाचा वैचारीक विकास खुंटला गेला, म्हणजे माणसाने विचार करायचाच नाही हे Fix झालं. मग पौराणीक कथा रंगमंचावर दाखवू लागेल. आमचे देवी देवता रंगमंचावर नाचु लागले काहीच अर्थ उरला नाही ह्या Form मधे.

मग ही अशी परंपरा अजुनही चालू आहे. जर आपण आपल्या मराठी रंगभुमीचा इतिहास वाचला तर लक्षात येईल की आपल्या नाटकांची सुरुवात अशीच झाली.

मराठी रंगभुमीवरचं १ लं नाटक १८४३ मधे झालं. सीता स्वयंवर, ज्याचं लेखन, दिग्दर्शन व गीतलेखन हे स्वतः विष्णुदास भावे ह्यांन केलं. तर १९१८ पर्यंत पौराणीक नाटकांचा काळ हा चालुच होता. सीतास्वयंवर, इंद्रजीत वध, राजा गोपीचंद हे असे काही नाटकं आहेत. इंग्रजांमुळे भरपुर चांगल्या गोष्टी भारतात आल्या, त्याबरोबर लोकांना/काही ठरावीक लोकांना **Shakespeare** माहीती झाली. त्यामुळे एक नवीन क्रांती झाली असं आपण म्हणू. १९१८ मधे 'एकच प्याला' हे नाटक रंगभुमीवर सादर करण्यात आलं. आणि ह्या नाटकानंतर, सामाजीक गोष्टींवर भाष्य करणारी नाटकं होवू लागली. ह्या क्रांतीमुळे का होईला, आज थोडा वर्ग सुशिक्षीत झाला. मग नंतर वरेरकर, अत्रे, रांगणेकर, वर्तक, माधवराव जोशी, शंकर पांडुरंग जोशी, य. न. टिपणीस इत्यादी नाटककारांचे प्रयत्न महत्वाचे आहेत.

ह्या नाटककरांनी नवीन प्रयोग चालु केले. हय प्रयोगांमुळे नाटकाचे २ भाग पडले १) **Comercial** २) **Experimental Theatre**, **Experimantal Theatre** हा असा प्रकार आहे की, संपुर्ण वेगळा. ज्यांचा बोद्धीक विकास झालेला आहे त्यांनाच हा प्रकार समजतो आणि दुर्देव असं आहे की आज आपल्या भारत देशात १/२% लोकही नाहीत ज्यांना नीट समजु शकेल हा त्री तर जाऊ दे. तेंडुलकर, चि. त्र्यं. खानोलकर, रत्नाकर मदकरी, महेश एककुंचवार इ. ह्या नाटककारांचं योगदान अतुल्य आहे. ह्या नाटककारांची काही नाटकं - १) वेड्याचं घर उन्हात २) सत्तेचे गुलाम ३) आंधळ्यांची शाळा ४) घाशीराम कोतवाल ५) एक शुन्य बाजीराव ह्या नाटकांनी/ नाट्यकृतींनी एक वेगळी छाप रंगभुमीवर सोडली.

हे एवढं सगळं झालं, तरी मराठी रंगभुमी किंवा नाटक ही कला हवी तेवढी develop झालेली नाहीय. पाश्चिमात्य रंगभुमी ही जगात १ क्रमांकावर आहे का? कारण तिथे नवीन-नवीन प्रयोग नेहमीच होत असतात.

आपल्या रंगभुमीचं म्हणाल तर **Now its past**, गेलेला क्षण हा भुतकाळ आहे. आपण प्रयत्नशील राहु आणि हा **Form** कसा विकसीत होईल हे बघु.

***

*"जेंव्हा काही खास लोक आपल्याला*
*दुर्लक्षित करत असतील,*
*तेव्हा समजून जा की त्यांच्या*
*सगळ्या गरजा पूर्ण झाल्या आहेत."*

*"जे आपल्यासोबत होऊ नये असं*
*वाटतं ते दुसऱ्यांसोबत करू नये."*

*"किर्ती आणि पराक्रम हे*
*जीवनाचे दोन डोळे आहेत."*

# कायम मुलगीच चुकते का?



शिवानी नानासो जाधव
Pre Law I

(एक प्रश्न या समाजात राहणाऱ्या प्रत्येक मुलाला....)

दिवाळी संपली, कॉलेज सुरु होणार. मित्र परत भेटणार. घरचे फराळ, घरचे फोटो शेअर कराल. या घोळक्यात तीपण असेल.......चोरुन चोरुन जिच्यावर आपोआप नजर जाते; जिने तुम्हाला परतून पाहावं असं वाटत, ती असे तुमच्या ग्रुप्ससारखे शेकडो ग्रुप्स असतील. तुमच्यासारखेच शेकडो यंगस्टार्स आणि त्यांच्या शेकडोंनी क्रश. तुम्हा शेकडो हृदयातल्या कोट्यावधी धडधडी. यात काही आकडे दिवसेंदिवस कमी होत आहे. मला प्रकर्षाने जाणवून आलेल्या तुमच्यातल्या त्या दोन मुली पहिली, अनोळखी मुलगा नको तितक्या जवळ आला म्हणून घाबरली. तिने सरळ चालत्या ट्रेनमधून उडी टाकली. अंगावर येणारा तो स्पर्श फार घाण होता म्हणून त्या स्पर्शापुढे ८० किलोमीटरच्या वेगाने धावणाऱ्या ट्रेनमधून खाली पडणे, लोखंडावर, दगडावर आदळणं समोरुन दुसरी ट्रेन येतेय का, याचा विचार न करणं कमी त्रासाचं होतं?

तिचे फ्रॅक्चर जुळतीलही, पण ती मनाने बरी होईल का?.......ती पुन्हा ट्रेनमध्ये चढेल का?.....ती अनोळखी हातांना घाबरेल का ? .....हे ज्याच्या हिरोगिरीमुळे झालं. त्याच्या हे लक्षात तरी येईल का?.......

दुसरी मुलगी अशाच मुलाच्या तावडीत सापडली पण हा....तिन अरेला कारे करायची हिम्मत दाखवली. तिला मिळाल काय? बेशुद्ध होईपर्यंत मार आणि ब्लेडचे वार. हे घडताना डझनाने लोक हजर होते. कणीही पुढं सरसावलं नाही. त्या मुलीचे कट्स भरुनही निघतील, पण ती धक्क्यातून बरी होईल का? ती चारचौघात बिनधास्त वावरेल का? ती अनोळखी लोकांना कधी विश्वासाने सहज पाहू शकेल का? मुख्य म्हणजे तिची पुन्हा कोण छेड काढायला गेलं, तर ती ब्लेड आठवून गप्प बसेल की पुन्हा समोरच्याला थोबडवेल?

कोण असतात ते रोडरोमिओ? कुठून येतात? आणि सगळेच रोमिओ या टोकाला जातात? काही असतात गुपचुप पाहणारे. समोरचीला लक्षात येईपर्यंत डोळ्यांनी टोचणारे. पण ती ओरडून सांगणार कोणाला? सगळ्यात महत्वाच म्हणजे पुरावा देणार कशाचा?

ही डोळ्यांची भूक वाढते मग हळूच चोरटे स्पर्श घरापर्यंत पाठलाग, कॉल्स, ई-मेल, ब्लेड, ॲसिडपर्यंत पोहोचते. यात कुठली हो मर्दुमकी? कुठला मर्द असं करतो? सिनेमाच नका सांगू. त्यातही असेल मर्द मरतातच. जे मिळवायचं ते न मिळवता.

'ए निक्या, ती बघ तुझी आयटम आली !'

'खामोश रे भाई लोग! अपनी भाभी जा रही है !'

'ए बोल ना ! आऊं क्या?'

'लाल दुपट्टेवाली!'

अशा अश्लील हाका मारुन मुलीला लाज वाटावी अस वागायच, नंतर तीच्या लाजण्याचा चुकीचा अर्थ लावायचा पण त्या पोरीच्या मनात वेगळच, पोरं सगळी अशीच, आवाज काढला तर कॉलेजमध्ये गॉसिप, नाही काढला तर एका छेडीवर एक छेड फ्री.

कॉलेजला जाण, पिक्चर पाहणं, बेस्टीजबरोबर फिरण, बॅगपॅकिंग करत भारत पाहणं, घरापासून लांब शिकण, फॅशनेबल वागण नाइट्सआऊट करण, लाँग ड्राइव्हला जाण, नोकरी करण, घराबाहेर पडण. या बेसिक गोष्टी आहेत यार!

तुम्ही बिनधास्त करु शकता मग मुली का नाहीत, कारण ती मुलगी आहे म्हणून.

